**Media Release**

# दिल्ली उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने ललित मोदी यांच्या विरोधातील सर्व आदेश रद्द केले आणि त्यांचा पासपोर्ट पुनरुज्जीवित केला

मुंबई, ऑगस्ट 27, 2014: न्यायमूर्ती बदर दुर्रेझ अहमद व न्यायमूर्ती विभू भाकरू यांचा समावेश असलेल्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने मैलाचा दगड ठरेल, असा निकाल दिला असून इंडियन प्रीमिअर लीगचे संस्थापक व मुख्य शिल्पकार आणि राजस्थान क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष ललित मोदी यांच्या विरोधातील सर्व आदेश रद्द केले आहेत आणि त्यांचा पासपोर्टही पुनरुज्जीवित केला आहे. तसेच, भारतात परतण्याचा ललित मोदी यांचा मार्ग मोकळा केला आहे.

मोदी यांचा पासपोर्ट परत करण्याबाबत नमूद करत, खंडपीठाने म्हटले की, पासपोर्ट रद्द करण्याचा आदेश अवैध होता आणि मनेका गांधी यांच्या संदर्भातील पासपोर्ट रद्द करण्याबाबतच्या प्रकरणामध्ये असलेली परीक्षा पार करणे या आदेशाला शक्य झाले नाही. तसेच, ललित मोदी यांचा पासपोर्ट रद्द करण्याबाबतचा आदेश बाह्य व बिनमहत्त्वाच्या साहित्याने प्रेरित असल्याने अवैध होता आणि पासपोर्ट रद्द करण्यासाठी समाधानकारक ठरेल, असा गंभीर विषय मांडता आला नाही, असेही खंडपीठाने नमूद केले. मोदी यांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर केली आणि व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चौकशीची मागणी केली होती, त्यामुळे पासपोर्ट रद्द करण्याचा आदेश कायदेशीर ठरत नाही, असे खंडपीठाने नमूद केले.

खंडपीठाने असेही म्हटले की, एफईएमएअंतर्गत, डिफॉल्ट किंवा नॉन-कम्प्लायन्स ऑफ समन्स यासंदर्भात विशिष्ट प्रक्रिया व वैधानिक तरतुदी आहेत आणि सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी या पार्श्वभूमवर अशा डिफॉल्टसाठी मोदी यांचा पासपोर्ट रद्द करणे कायद्याला अनुसरून नाही.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने दिलेल्या मैलाचा दगड ठरेल अशा निकालाविषयी इंडियन प्रीमिअर लीगचे संस्थापक व मुख्य शिल्पकार आणि राजस्थान क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष ललित मोदी म्हणाले, “हा संघर्ष दीर्घ आणि अवघड होता आणि आज मी आरोपमुक्त आहे. माझा कायमच

न्यायव्यवस्थेवर विश्वास होता आणि अखेरीस, न्याय झाला आहे. असत्यावर आधारित असलेली कोणतीही केस आपल्या न्यायसंस्थेसमोर कधी टिकू शकली नाही आणि त्यासाठी मी अत्यंत आभारी आहे. मी भारतात परत यायला उत्सुक आहे, असे मी कायमच म्हटले आहे. आपला आवडता खेळ क्रिकेट स्वच्छ करण्यासाठी आणि त्यासंबंधी जे काही असेल त्यासाठी मी माझा संघर्ष यापुढेही कायम ठेवणार आहे.”

यंदा ललित मोदी यांची नियक्ती राजस्थान क्रिकेट असोसएशनच्या अध्यक्षपदी झाली. या निकालामुळे आणि त्यांचा पासपोर्ट परत मिळणार असल्यामुळे ललित मोदी यांना भारतात परतण्यासाठी आता कोणताही अडथळा राहिला नाही.

यंदा फेब्रुवारीमध्ये, मुंबई उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठानेही ललित मोदी यांच्या विरोधातील निकाल रोखून धरण्याचे ईडीचे (एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट) मत रद्द केले होते. न्यायमूर्ती वजिफदर व न्यायमूर्ती कोलाबावाला यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने दोन गोष्टींच्या आधारे यास अनुमती दिली होती. त्या गोन गोष्टी म्हणजे, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे उल्लंघन, ज्यामध्ये एजन्सीची भिस्त असलेली बहुतांश कागदपत्रे पुरवली गेली नव्हती आणि व्यक्त केलेले मत पूर्णतः कोणत्याही कारणाविना होते. त्यानंतर न्यायालयाने ईडीला नव्याने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा पर्याय दिला होता, पण तसे करण्यात आले नव्हते.